# फिनिक्स फाऊंडेशन सर्वसामान्य दृष्टीहीनांसाठी देवदूत ठरले

## प्रियंका आठरे यांचे प्रतिपादन; जागतिक दृष्टीदान दिनानिमित्त फिनिक्स फाऊंडेशनच्या मोफत नेत्र तपासणी शिबिराला प्रतिसाद

नगर – फिनिक्स सोशल फाऊंडेशन सर्वसामान्य वर्गातील दृष्टीहीनांसाठी देवदूत ठरले आहे. या चळवळीच्या ३३ वर्षाच्या खडतर प्रवासात अनेक अडचणींवर मात करुन नेत्रदानाची मोठी सामाजिक चळवळ उभी राहिली आहे. या चळवळीच्या माध्यमातून दृष्टीदोष असलेल्या गरजू घटकांना आधार मिळत आहे. जालिंदर बोरुडे यांच्या सामाजिक कार्याचा समाज व शासनाकडून गौरव होण्याची अपेक्षा दिलासा सेलच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रियंका आठरे यांनी केले.



जागतिक दृष्टीदान दिनानिमित्त फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नागरदेवळे (ता. नगर) येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले.

जागतिक दृष्टीदान दिनानिमित्त फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नागरदेवळे (ता. नगर) येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी आठरे बोलत होत्या. याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य शरद झोडगे, फिनिक्सचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, पोलीस कॉन्स्टेबल प्रियंका पवार, संजय ताजने, इंजि. वैभव दानवे, इंजि. सौरभ बोरुडे, मोहन कुऱ्हे आदींसह ग्रामस्थ व जिल्ह्यासह राज्यातून आलेले शिबिरार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात जालिंदर बोरुडे यांनी, शेतकरी व गरजू घटकातील ज्येष्ठ नागरिकांचे दृष्टीदोष दूर करुन त्यांचे जीवन प्रकाशमान करण्याचे काम फिनिक्स फाऊंडेशन करत आहे. सर्व महापुरुषांची जयंती, पुण्यतिथी, सण–उत्सव फाऊंडेशनच्या माध्यमातून सामाजिक उपक्रमाने साजरे करुन दर महिन्याला या शिबिराचे आयोजन केले जाते. नेत्रदान व अवयवदान चळवळीत देखील फाऊंडेशनचे योगदान सुरु असून, अनेक दृष्टीहीनांना नेत्रदानाच्या माध्यमातून नवदृष्टी मिळाल्याची माहिती त्यांनी दिली.

शरद झोडगे म्हणाले की, फिनिक्सच्या सामाजिक कार्यामुळे गावाचे नाव राज्यभरात उंचावले गेले आहे. नेत्र तपासणी शिबिर व नेत्रदान चळवळीला या गावातून ऊर्जा मिळाली. जालिंदर बोरुडे यांनी ग्रामस्वच्छते पासून सुरू केलेली ही चळवळ १९९१ साली नेत्र तपासणी शिबिर व नेत्रदान चळवळीकडे वळाली. ३३ वर्षाचा टप्पा गाठत असताना लाखो लोकांवर मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. तर हजारो लोकांना नेत्रदान चळवळीच्या माध्यमातून नवदृष्टी मिळवून देण्याचे फिनिक्सने केले आहे. फिनिक्सच्या माध्यमातून उभारले जात असलेल्या नेत्रालयासाठी आर्थिक मदत उभी करुन देण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

राष्ट्रीय अंधत्व निवारण समन्वय समितीच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी जालिंदर बोरुडे यांची निवड झाल्याबद्दल शिबीरार्थी व नागरदेवळे ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच फिनिक्स फाऊंडेशनच्या नियोजित नेत्रालयाच्या बांधकामासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य शरद झोडगे यांनी ५१ हजार रुपयाची आर्थिक मदत जाहीर केली.

नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिरात तज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची नेत्रतपासणी केली. या शिबिरात ४३० रुग्णांची तपासणी करण्यात आली. ५९ शिबीरार्थींवर पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोतीबिंदूच्या मोफत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर खरपुडे यांनी केले. आभार राजेंद्र बोरुडे यांनी मानले. शिबिर यशस्वी करण्यासाठी गौरव बोरुडे, ओम बोरुडे, जय बोरुडे, जगदीश बोरुडे, विशाल भिंगारदिवे, गिरीश पाटील, अनिल बनसोडे, दत्ता दळवी यांनी परिश्रम घेतले.

# ‘अहमदनगर मुस्लिम फाउंडेशन’ने दिला विधवा महिलांना आर्थिक मदतीचा धनादेश

## मुस्लीम फाउंडेशनचे वंचित व दुर्बलांसाठी केलेले कार्य अनुकरणीय : शांताराम राऊत



अहमदनगर डिस्ट्रिक्ट मुस्लिम वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने विधवा महिलांना मदतीचे धनादेश शांताराम राऊत यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

नगर – समाजातील वंचित आणि दुर्बल घटकांसाठी कार्यरत असलेल्या अहमदनगर मुस्लिम वेल्फेअर फाउंडेशनने एक अनुकरणीय पाऊल उचलले आहे. संस्थेच्या वतीने आज शहरातील अनेक विधवा महिलांना आर्थिक मदतीचे धनादेश वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे गरजूंना नवा आत्मविश्वास मिळाल्याचे चित्र आहे. या सामाजिक उपक्रमाचे अनेकांनी खुलेपणाने स्वागत केले असून, इतर संस्थांसाठीही ही एक प्रेरणादायक कृती ठरली आहे, असे प्रतिपादन निसर्ग लॉन औरंगाबादचे संचालक व नाभिक संघटना महाराष्ट्रचे अध्यक्ष शांताराम राऊत यांनी केले.

अहमदनगर डिस्ट्रिक्ट मुस्लिम वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने विधवा महिलांना मदतीचे धनादेश शांताराम राऊत यांच्या हस्ते मुस्लिम फाउंडेशनच्या कोठला येथील कार्यालयात वाटप करण्यात आले. यावेळी अहमदनगर मुस्लिम वेल्फेअर फाउंडेशनचे फाऊंडर व्यवस्थापक व माजी उपनगराध्यक्ष हाजी नजीर, अध्यक्ष डॉ. सईद शेख, सेक्रेटरी मुबीन तांबटकर, ट्रस्टी हाजी मिर्झा, इंजि. इकबाल सय्यद आदी उपस्थित होते. या विशेष कार्यक्रमात, प्रत्येक लाभार्थी महिलेला मदतीचे धनादेश सुपूर्त करण्यात आले. मदतीसोबत महिलांना आत्मनिर्भरतेच्या दिशा दाखविणारे मार्गदर्शनही देण्यात आले.

पुढे बोलताना शांताराम राऊत म्हणाले की या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य आहे की मुस्लिम फाउंडेशनने विधवा महिलांना प्राधान्य दिले आहे.

महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक सशक्तीकरणाचे ध्येय मुस्लिम फाउंडेशनचे असुन विधवा महिलांसाठी ही मदत फक्त रक्कम नसून त्यांना जगण्याची नवी उमेद देणारी प्रेरणा आहे. असे सांगितले.

समाजातील प्रत्येक घटक सुरक्षित आणि सन्मानाने जगावा, हेच आमचे ध्येय आहे, असे मुस्लिम फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सईद शेख यांनी सांगितले. सूत्रसंचालन मुबीन तांबटकर यांनी केले. हाजी मिर्झा यांनी आभार मानले.

# नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाईसाठी १ ते ८ जुलै दरम्यान ऑनलाईन परीक्षा

नगर – नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई संवर्गातील पदासाठी आय.बी.पी.एस.च्या संकेतस्थळावर यशस्वीरित्या अर्ज भरलेल्या व पात्र असलेल्या उमेदवारांची १ ते ८ जूलै दरम्यान ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारास त्यांनी नोंदणी केलेल्या ई–मेलवर पाठविण्यात येणार असल्याची माहिती नोंदणी व मुद्रांक विभागातर्फे देण्यात आली आहे.

नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई गट ड संवर्गातील २८४ पदे भरतीसाठी २२ एप्रिल रोजीच्या वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. ही भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकृती तसेच ऑनलाईन पद्धतीने परीक्षेच्या आयोजनासाठी आय.बी.पी.एस (इन्स्टिट्यूट ऑफ बँकींग पर्सोनल सिलेक्शन) कंपनीस नियुक्त करण्यात आले आहे. त्यानुसार कंपनीकडून २२ एप्रिल ते १६ मे दरम्यान ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरुन घेण्यात आलेले आहेत.

परीक्षेसाठी नोंदणी व मुद्रांक विभागाकडून कोणत्याही इतर एजन्सीची वा मध्यस्थाची नेमणूक करण्यात आलेली नाही. याबाबत कोणती व्यक्ती, संस्थेकडून अथवा मध्यस्थाकडून तशी बतावणी करण्यात येत असल्यास अशा व्यक्ती वा संस्थेपासून उमेदवारांनी सावध रहावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# अहिल्यानगर शहरात १४ जून रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे अधिवेशन

## कॉ. डॉ. राम बाहेती यांची राहणार प्रमुख उपस्थिती; स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसह राजकीय व सामाजिक परिस्थितीवर होणार चर्चा

नगर – भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे त्रैवार्षिक जिल्हा अधिवेशन १४ जून रोजी अहिल्यानगर शहरात होणार असल्याची माहिती भाकपचे जल्हा सचिव कॉ. अ‍ॅड. बन्सी सातपुते यांनी दिली.

पारिजात चौक, गुलमोहर रोड येथील कोहिनूर मंगल कार्यालयात सकाळी १० वाजता या अधिवेशनाचे उद्घाटन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सहसचिव कॉ.डॉ. राम बाहेती यांच्या हस्ते होणार आहे. या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून राज्य सचिव कॉ. अ‍ॅड. सुभाष लांडे तर भारतीय महिला फेडरेशनच्या राज्य अध्यक्ष कॉ.स्मिता पानसरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

उद्घाटन सत्रानंतर जिल्हा सचिव राजकिय व संघटनात्मक अहवाल मांडतील. विविध आघाड्यांचे अहवाल मांडले जातील. त्यावर तालुका परिषदांमधून जिल्हा पक्ष परिषदेसाठी निवडून आलेले प्रतिनिधी चर्चा करणार आहे. परिषदेत पुढील तीन वर्षांसाठी जनतेच्या प्रश्नावर करावयाच्या आंदोलनाची दिशा ठरवली जाणार आहे. तसेच तीन वर्षांसाठी नवीन कौन्सिल, कार्यकारिणी व पदाधिकारी निवडले जाणार आहे. तसेच नाशिक येथे २२ ते २४ जून रोजी आयोजित राज्य अधिवेशनासाठी प्रतिनिधींची निवड करण्यात येणार आहे. या जिल्हा अधिवेशनात जिल्ह्यातून २५० प्रतिनीधी सहभागी होणार आहे. अधिवेशन परिसराला कॉ. शांताराम वाळुंज नगरी व विचार पीठाला कॉ. दादाभाऊ गायकवाड यांचे नाव देण्यात येणार. असल्याची माहिती जिल्हा सहसचिव कॉ.सुधीर टोकेकर व संतोष खोडदे यांनी दिली.

डॉ. राम बाहेती हे सद्य राजकीय व सामाजिक परिस्थितीवर मार्गदर्शन करणार आहे. परिषदेत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवरही चर्चा होणार असून, विविध विषयांवर ठराव केले जाणार आहे. अधिवेशनात शेतकऱ्यांना सरसकट संपूर्ण कर्जमाफी, जन विरोधी व घटनाविरोधी विशेष जन सुरक्षा विधेयक, महिला सुरक्षा, स्मार्ट मिटरला विरोध, दलित, आदिवासी व सामाजिक न्याय खात्याचा निधी वळवण्याला विरोध हे विषय केंद्रस्थानी राहणार आहे. तसेच जिल्ह्यातील विकासाच्या दृष्टीने प्रलंबित असलेल्या प्रश्नावर आंदोलनाचा निर्णय घेण्यात येणार आहे.



विळद घाट येथील डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीतील इलेक्ट्रॉनिक अ‍ॅण्ड टेली कम्युनिकेशन मधील २६ विद्यार्थ्यांची कॅम्पसद्वारे नोकरीसाठी निवड झाली. (छाया – विजय मते)

# डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीतील २६ विद्यार्थ्यांची कॅम्पसद्वारे नोकरीसाठी निवड

नगर – विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट विभागामार्फत इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलेकम्युनिकेशन इंजिनिरिंग विभागातील विद्यार्थ्यांकरीता करीअर घडवण्याच्या दृष्टीने एकुण ८ कंपन्यांद्वारे चतुर्थ वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलेकम्युनिकेशन इंजिनिअर विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखती दरम्यान विद्यार्थ्यांची प्रथम योग्यता चाचणी घेण्यात आली. त्यानंतर तांत्रिक चाचणी आणि प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलेकम्युनिकेशन इंजीनियरिंग विभागातील एकुण २६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

स्नेहल पांडुरंग कोतकर हिची पुणे येथील कोरिझो प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत निवड होऊन सर्वात मोठे पॅकेज मिळाले. यावेळी बोलताना ती असे म्हणाली की या नोकरीमुळे माझ्या करिअरला एक चांगली दिशा मिळाली आहे. इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलेकम्युनिकेशन इंजीनियरिंग विभागात वेळोवेळी आयोजित केलेल्या विविध सेमिनार (चर्चासत्र) आणि वर्कशॉप (कार्यशाळा) यामुळे सर्व विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानात भर पडली. तसेच बुद्धिमत्ता चाचणी, स्पर्धा परीक्षा तयारी, मुलाखत कौशल्य आणि व्यक्तिमत्व विकास या सारख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना तांत्रिक मुलाखतीस सामोरे जाण्यासाठी आत्मविश्वास मिळाला. माझ्या यशामध्ये माझे आई–वडील, कॉलेजचे प्राचार्य, ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट सेल, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन डिपार्टमेंटच्या शिक्षकांनी वेळोवेळी केलेल्या मोलाच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे.

पुणे येथील कोरिझो प्रायव्हेट लिमिटेड, सिरमा एसजीएस टेक्नॉलॉजी लिमिटेड, मनस्वी टेक सोल्युशन्स प्रा. लि.ईगलबाइट सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड, क्यूस्पायडर सॉफ्टवेअर सोल्यूशन, लॉजिपूल इन्फोटेक तर अहिल्यानगर येथील एपिटोम कंपोनेंट्स प्रायव्हेट लिमिटेड, फ्लेअर्स सोलर पीव्ही सिस्टीम्स, जी.एस. इंडस्ट्रीज या इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलेकम्युनिकेशन क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना सरासरी चार लाख आणि कमाल साडेसहा लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज देण्यात आले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन डॉ.राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ.पी. एम.गायकवाड, डायरेक्टर–टेक्निकल प्रा. सुनिल कल्हापुरे व प्राचार्य डॉ.रविंद्र नवथर, इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलेकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ.अनिता पाटील, ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट ऑफीसर प्रा. सुदर्शन दिवटे, विभागीय शिक्षक समन्वयक प्रा. अमोल लांडगे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# अहिल्यानगर शहरातील ‘युवान’मार्फत मोफत वसतिगृहाची प्रवेशप्रक्रिया सुरु



अहिल्यानगर शहरातील ‘युवान’मार्फत मोफत वसतिगृहाची प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

नगर – अहिल्यानगर शहरात उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या अथवा मिळवलेल्या अनाथ, एकल पालक, दिव्यांग, भटके –विमुक्त, आदिवासी आणि ग्रामीण भागातील भूमीहिन गरजु विद्यार्थी आणि विद्यार्थीनींना मोफत वसतिगृह प्रवेशाची प्रवेश प्रक्रिया युवानमार्फत सुरु आहे. मागील १० वर्षांपासून नगर शहरात गरजु तरुण विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक सुविधा पुरविण्यात येतात. यात तरुणांसाठी शहरातील एकमेव मोफत वसतीगृह, भोजन, स्पर्धा परीक्षा ग्रंथालय, अभ्यासिका, शैक्षणिक साहित्य, समुपदेशन आदींचा समावेश आहे. त्याचा लाभ घेऊन आजवर २५० पेक्षा अधिक वंचित युवान विद्यार्थी विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवत आहेत तसेच सामाजिक बांधिलकी ठेऊन वंचितांना मदतीचा यथाशक्ती प्रयत्न करत आहेत.

प्रेरणा व्याख्यानाचा लाभ घेऊन हजारो विद्यार्थ्यांनी आपल्या करियरची दिशा निश्चित केली आहे. नैसर्गिक व मानव निर्मित आपत्ती काळात स्वयंसेवक म्हणून अनेकांनी देशभर सेवा आणि मदत कार्यासाठी योगदान दिले आहे. फक्त सुविधा नाही तर ‘चारित्र्य निर्माण’ हे ब्रीद घेऊन युवान सेवाव्रती कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठीही युवान मार्फत वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात.

तांत्रिक शिक्षण घेणारे (डिप्लोमा, आयटीआय) व बारावी उत्तीर्ण होऊन शहरात व्यावसायिक अभ्यासक्रमास (इंजीनियरिंग, मेडिकल, कॉम्प्युटर सायन्स, बिज़नेस अ‍ॅडमिनीस्ट्रेशन, लॉ इ.) प्रवेश घेतलेल्या गरजु विद्यार्थ्यांना मोफत वसतिगृहासाठी प्राधान्य असेल.

प्रवेशासाठी ९०११११८७८७ किंवा ८८०५२८२६९० यावर अथवा कोठला, तारकपूर रोड स्थित, जुन्या महेश थिअटर जवळील युवान आणि शांतिकुमारजी फिरोदिया फौंडेशन संचलित छात्र निवास येथे संपर्क साधावा. तसेच हा सेवायज्ञ अधिक पुढे घेऊन जाण्यासाठी दानशूरांनीही हात द्यावा, असे आवाहन युवान संस्थापक संदिप कुसळकर यांनी केले.

# सामाजिक सुरक्षितता

*तुमच्या आमच्या सुरक्षेला आणि काय हवं*
*डोक्यावर हेल्मेट, पायामध्ये बूट, सुरक्षेचा*
*गॉगल आणि खिशात लायसन, नियम*
*पाळशील तर, सुखी होशील, अपघात*
*टाळशील तर फिट राहशील !*
*सिग्नलला थोड थांबा ! करू नका घाई !*
*अति घाई तुम्हाला ही संकटात नेई !*
*अपघात वाचवू या, दवाखाना टाळू या !*
*वाहतुकीचे नियम आपण पाळू या !*
*पॉलीसी ही काढू आपला भरोसा ही नाही !*
*यमदूत कधी येईल सांगता येत नाही !*
*सुखी जीवनाचा मंत्र देतो या ! फिटनेस वाढवू या !*
*शपथ घेऊ या !*
*कोरोना हा परत येतोय तब्येतीला जपा!*
*कचरा रस्त्यावरती पडतोय दुर्गंधीला थांबवा !*
*पालिकेनी काळजी घ्यावी गाडी वेळेत नाही !*
*स्वच्छ सुंदर भारत मिशन पूर्ण होत नाही !*
*एक होऊ या – शपथ घेऊ या शासनाला ही सावध करू या.....!*

*– अलेक्स कदम (जागरुक नागरिक)*

# छत्रपती अभियांत्रिकीमध्ये भरती मेळाव्यात १३ कंपन्या आणि १२२ विद्यार्थ्यांचा सहभाग

नगर – नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय या ठिकाणी १२ जून रोजी झालेल्या भरती मेळाव्यामध्ये १३ कंपन्यांनी आपला सहभाग नोंदवत कम्प्युटर इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजीनियरिंग विभागाच्या जवळपास १२२ विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. यामध्ये प्रामुख्याने किंसफॉक टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड, टेक्नोग्रोथ सॉफ्टवेअर सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड, वाई टेक्नॉलॉजी पुणे, स्वामी लॉजीपूल इन्फोटेक पुणे, अनक्यूब लॅब्स पुणे, टी व्ही डी सॉफ्टवेअर सोल्युशन अहिल्यानगर, शोरत इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड पुणे या कंपनी कम्प्युटर इंजिनिअरिंग साठी तर यु डब्ल्यू एस एन्व्हायरोटेक प्रायव्हेट लिमिटेड, पुणे ही कंपनी मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागासाठी आणि कृष्णा ग्रीन एनर्जी लिमिटेड या कंपनीने इलेक्ट्रॉनिक आणि टेलिगमुनिकेशन इंजीनियरिंग तसेच इतर इंजिनिअरिंग कोर्सेस साठी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यासाठी श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाला पसंती दिली.



छत्रपती अभियांत्रिकीमध्ये भरती मेळाव्यामध्ये १३ कंपन्यांनी आपला सहभाग नोंदवत कम्प्युटर इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजीनियरिंग विभागाच्या जवळपास १२२ विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.

उद्घाटनप्रसंगी टी. व्ही. डी. सॉफ्टवेअर सोल्युशन्सचे वैभव ठोंबरे, कृषीनाथ ग्रीन एनर्जी लिमिटेड चे सचिन राऊत तर यु. डब्ल्यू. एस. एन्व्हायरोटेक प्रायव्हेट लिमिटेड, पुणे येथून आलेले श्रीकुमार पिल्लाई यांनी विद्यार्थ्यांना या भरती मेळाव्याविषयी माहिती देत मुलाखतीची नियमावली आणि निकष हे समजावून सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी मुलाखत ही केवळ एक प्रश्न – उत्तर प्रक्रिया नसून, ती विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व, अनुभव, आणि कौशल्यांची चाचणी घेते असे मत मांडत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या नोकरीच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट विभाग अधिकारी प्रा. एस. एम. वाळके तसेच समन्वयक प्रा. जी. बी. साळुंके, प्रा. ए. आर. माने, प्रा. पी. डी. कोतकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन करून विद्यार्थ्यांना सहकार्य केले. विभागप्रमुख डॉ. एम. के. भोसले, प्रा. एस. पी. विधाते, प्रा. ए. बी. काळे, प्रा. पी. जी. निकम, डॉ. व्ही. व्ही. पाटील यांनी सर्व विभागातील विद्यार्थ्यांपर्यंत तसेच इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपर्यंत या भरती मेळाव्याची माहिती पोहोचवण्यासाठी सहकार्य केले. भरती मेळाव्यामध्ये घेण्यात आलेल्या मुलाखतींचे निकाल पुढील आठवड्यात जाहीर करणार असल्याचे कंपन्यांचे एच. आर. यांनी सांगितले.

# ‘एक्सपेरिएन्शल लर्निंग’मधून घडत आहेत नवशिक्षक

### आयकॉन स्कूलचा अनोखा उपक्रम



द आयकॉन पब्लिक स्कूलमध्ये आयोजिलेल्या एक्सपेरिएन्शल लर्निंग कार्यशाळेमध्ये सहभागी झालेले नवशिक्षक.

नगर – ‘द आयकॉन पब्लिक स्कूल, अहिल्यानगर’च्या परिसरात ५ आणि ६ जून रोजी ऊर्जा, सर्जनशीलता आणि सहकार्याने भरलेले वातावरण अनुभवायला मिळाले. निमित्त होते दोन दिवसीय एक्सपेरिएन्शल लर्निंग कार्यशाळेचे, ज्यामध्ये पारंपरिक शिक्षणपद्धतींना नव्या दृष्टीकोनातून पाहून शिक्षण अधिक आनंददायी आणि अर्थपूर्ण कसे बनवता येईल, यावर भर दिला गेला.

शाळेच्या सतत व्यावसायिक विकास उपक्रमाचा एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत इंग्रजी, विज्ञान, समाजशास्त्र, गणित, भाषा आणि कला या विभागांतील शिक्षकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

कार्यशाळेच्या सुरुवातीपासूनच शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या भूमिकेतून शिकण्याची संधी देण्यात आली. कथाकथन, भूमिका सादरीकरण, प्रयोग, बाह्य निरीक्षण, आणि वर्गनाट्य यांसारख्या विविध कृतींमधून अगदी जटिल व तात्त्विक संकल्पनाही वास्तवाशी जोडून शिकवता येतात, हे अनुभवातून स्पष्ट करण्यात आले.

या सत्रांचे मार्गदर्शन २१व्या शतकातील शिक्षण कौशल्यांमध्ये प्रशिक्षित तज्ज्ञ मार्गदर्शकांनी केले. त्यांनी दाखवून दिले की, सक्रिय सहभाग, परावर्तन आणि सहकार्य हे नियमित अध्यापनात सहज वापरता येते. या कार्यशाळेत बूल्म वर्गीकरण पद्धती (स्मरण, समज, अनुप्रयोग, विश्लेषण, मूल्यमापन आणि सर्जनशीलता) आणि कोल्ब यांचे अनुभवाधिष्ठित शिक्षण चक्र (थेट अनुभव, चिंतनशील निरीक्षण, संकल्पनात्मक विश्लेषण, आणि प्रत्यक्ष प्रयोग) यांचा समावेश करण्यात आला होता.

प्रत्येक क्रियाकलाप या चौकटींशी जोडले गेले, ज्यातून हे सिद्ध झाले की एक्सपेरिएन्शल लर्निंगच्या साहाय्याने विद्यार्थ्यांमध्ये केवळ माहिती न देता, ती समजून घेणे, विचार करणे आणि सर्जन करणे शक्य होते.

या कार्यशाळेतील एक विशेष सत्र होते – तुमचा स्वतःचा अध्याय तयार करा, ज्यामध्ये शिक्षकांनी आपल्या अभ्यासक्रमातील घटकांवर आधारित एक्सपेरिएन्शल लर्निंग पाठ योजना तयार केल्या. प्रत्येक गटाने त्यांचे सादरीकरण केले आणि सहशिक्षक व तज्ज्ञांकडून सकारात्मक अभिप्राय घेतला. यामुळे त्यांना केवळ अंमलबजावणी नव्हे तर नवकल्पना राबवण्याचा आत्मविश्वास मिळाला.

कार्यशाळेच्या समारोपात मुख्याध्यापिका दीपिका नगरवाला यांनी आपल्या भाषणात सांगितले, एक्सपेरिएन्शल लर्निंग ही काही अतिरिक्त गोष्ट नाही, तीच खऱ्या अर्थाने शिकण्याची पद्धत आहे. जेव्हा विद्यार्थी शिकणाऱ्या गोष्टींशी स्वतःला जोडतात, तेव्हा ते त्या गोष्टी लक्षात ठेवतात, अंमलात आणतात आणि त्यातून घडतात. त्यांनी सर्व मार्गदर्शक, सहाय्यक कर्मचारी आणि शिक्षक सहभागींचे आभार मानले. सर्व शिक्षकांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

द आयकॉन पब्लिक स्कूल, अहिल्यानगर येथे पार पडलेली ही एक्सपेरिएन्शल लर्निंग कार्यशाळा विद्यार्थ्यांना केवळ परीक्षांसाठी नव्हे, तर जीवनासाठी तयार करणाऱ्या शिक्षणप्रणालीचे प्रतीक ठरली आहे. हे शक्य झाले आहे अशा शिक्षकांमुळे जे परावर्तक, संसाधनयुक्त आणि परिवर्तनवादी आहेत

शरद मुथा एज्युकेशन सोसायटी अंतर्गत द आयकॉन पब्लिक स्कूल ही अहिल्यानगरच्या मध्यभागी असलेली एक स्थापित सीबीएसई संलग्न शाळा आहे जी नर्सरी ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सेवा देते.

# अ.भा.श्री वर्धमान स्थानकवासी जैन स्वाध्यायी संघाचे १५ जूनला आनंदधाममध्ये प्रथम संमेलन

### जय्यत तयारी; राज्यभरातून स्वाध्यायी येणार



नगर – अखिल भारतीय श्री वर्धमान स्थानकवासी जैन स्वाध्यायी संघाने राष्ट्रसंत, आचार्य सम्राट गुरूदेव श्री आनंदऋषिजी म.सा.यांच्या १२५ व्या जन्म जयंतीचे औचित्य साधून १५ जूनला आनंदधाममध्ये जैन स्वाध्यायी संघाचे प्रथम संमेलन आयोजित केले आहे. या संमेलनाची जय्यत तयारी करण्यात आली असून संमेलनासाठी महाराष्ट्र राज्याच्या विविध भागांमधून स्वाध्यायी येणार आहेत.

१५ जूनला सकाळी ९ वाजता संमेलनाचा शुभारंभ होईल. संमेलनात संत आणि सतीवृंदांनी घेतलेले स्वाध्यायी वर्ग एवम् स्वाध्यायी संघाच्या संबंधित उद्‌बोधन, चर्चासत्र, अनुभव सर्वांसमोर ठेवण्यात येतील. सायंकाळी ५ वाजता या एकदिवसीय संमेलनाचा समारोप करण्यात येईल. १९८१ मध्ये स्थापन केलेल्या या संघाचे अहिल्यानगरीतील आनंदधाममध्ये हे पहिले संमेलन होणार आहे. यामुळे या संघाशी जोडल्या गेलेल्या प्रत्येक सदस्याचा उत्साह वाढल्याचे दिसून येत आहे.

आनंदऋषिजींचे सुशिष्य महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म.सा., प्रबुध्द विचारक श्री आदर्शऋषिजी म.सा. आदि संत-साध्वींच्या पावन सानिध्यात आनंदधाममधील कार्यक्रमाची शृंखला निरंतर गतिशील आहे. या शृंखलेतील स्वाध्यायी संघाची गती आणि प्रगती, स्वाध्यायाची आवश्यकता आणि उपयुक्तता, वर्तमानकाळाची गरज, भविष्यकालीन योजना, अपेक्षा, शिबिराच्या प्रशिक्षणाची व्यवस्था या संबंधित चर्चा, ज्या संघामधून स्वाध्यायी सेवा दिली जात आहे. ज्यांच्या सहकार्याने सेवा देण्यात येत आहे आणि गुरूदेवांवर ज्यांची एकनिष्ठ श्रध्दा आहे, अशा वरिष्ठ सदस्यांसाठी स्वाध्यायी संघाचे हे प्रथम संमेलन आयोजित करण्यात आले आहे. श्रीसंघासह संमेलनास उपस्थित राहिलेल्यांना संघाच्या उत्कर्षासाठी विचारांचे आदान-प्रदान करण्याची सुवर्णसंधीच उपलब्ध होणार आहे.

जैन स्वाध्यायी संघांनी संमेलनास उपस्थित रहावे, असे आवाहन श्री व स्था.जैन श्रावक संघ, नगर, श्री ति.र.स्था.जैन धार्मिक परिक्षा बोर्ड आणि अ.भा. श्री व स्था. जैन स्वाध्यायी संघ यांचेवतीने करण्यात आले आहे.




श्री साई द्वारका सेवा ट्रस्टच्या वतीने गरजूवंत रुग्णांना आर्थिक मदत व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

# श्री साई द्वारका सेवा ट्रस्टचे वैद्यकीय कार्य कौतुकास्पद : अनिल मोहिते

नगर – श्री साई द्वारका सेवा ट्रस्टच्या वतीने गरजूवंत रुग्णांना वर्षभर वैद्यकीय मदत देण्याचे काम केले आहे. या माध्यमातून रुग्ण आपल्या आजारपणाची प्राथमिक तपासणी करून घेतो व त्यानुसार डॉ. वैद्यकीय उपचार करत असतात ॲड. धनंजय जाधव यांचे सुरू असलेले सामाजिक कार्य कौतुकास्पद आहे. त्यांनी नेहमीच समाजातील दीनदुबळ्यांची सेवा करण्याचे काम केले आहे. स्व. कृष्णा जाधव यांच्या विचाराचा वारसा ते पुढे चालवीत आहे असे प्रतिपादन भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले.

श्री साई द्वारका सेवा ट्रस्टच्या वतीने गरजूवंत रुग्णांना आर्थिक मदत व शालेय साहित्याचे वाटप अनिल मोहिते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक धनंजय जाधव, निखिल वारे, संजय ढोणे, अशोक गायकवाड, विठ्ठल लांडगे, राजेंद्र काळे, दत्ता गाडळकर, उदय अनभुले, सुरेश लालबागे, सोमनाथ जाधव, पोपट पाथरे उपस्थित होते.

धनंजय जाधव म्हणाले की, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मनुष्य धकाधकीचे जीवन जगत असताना त्यांना विविध आजारपणांना सामोरे जावे लागते अचानकपणे येणारे आजारपण आपल्या आर्थिक परिस्थितीमुळे काहीजण अंगावरच काढत असतात त्यामुळे त्यांना भविष्यकाळात मोठ्या आजारपणाला सामोरे जावे लागते ही बाब लक्षात आल्यानंतर प्राथमिक उपचारासाठी श्री साई द्वारका सेवा ट्रस्टच्या माध्यमातून गरजूवंत रुग्णांना आर्थिक मदत केली जाते असे ते म्हणाले.

# कवी सुभद्रासुत आंधळे लिखित मायबाप विद्यापीठ काव्यसंग्रहास ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय काव्य लेखन पुरस्कार’



मायबाप विद्यापीठ काव्यसंग्रहास डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय काव्य लेखन पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नगर – कवी सुभद्रासुत आंधळे (रा. केडगाव, अहमदनगर) लिखित मायबाप विद्यापीठ या वास्तववादी काव्यसंग्रहास डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय काव्य लेखन पुरस्कार जाहीर करण्यात आला असून पुणे येथे पार पडलेल्या समारंभात त्यांचा गौरव करण्यात आला.

सन २०२४ मध्ये प्रकाशित झालेल्या या काव्यसंग्रहाची निवड संत गाडगे महाराज विचार मंच, ओतूर आणि ज्ञानज्योत फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य, मांजरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वर्धापन दिन विशेष कार्यक्रमात राज्यभरातून मागवलेल्या विविध साहित्यकृतींमधून करण्यात आली. यामध्ये काव्यप्रकारातील सुभद्रासुत आंधळे यांची निवड करण्यात आली.

सन्मानप्रदान सोहळा पुण्यातील वेदशास्त्रोत्तेजक सभागृह, सदाशिव पेठ येथे ७ जून रोजी झाला. यावेळी कवी सुभद्रासुत आंधळे यांना त्यांच्या कन्या शितल आंधळे यांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि साहित्यप्रती प्रदान करून गौरवण्यात आले.

या सोहळ्याचे संमेलनाध्यक्ष जग बदलणारा बापमाणूस या पुस्तकाचे लेखक जगदीश ओहोळ होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक हनुमंत पडवळ उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे उद्घाटन इंदू फार्मा, पुणेचे अध्यक्ष डॉ. रामदास कुटे यांच्या हस्ते झाले.

कवी सुभद्रासुत यांचा हा चौथा काव्यसंग्रह असून अष्टाक्षरी प्रकारातील आणि शॉपिझन डॉट ईन प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेला आहे.

कार्यक्रमाचे नियोजन संत गाडगे महाराज विचारमंचचे संस्थापक कार्याध्यक्ष रणजीत पवार, अध्यक्ष खं. र. माळवे, तसेच ज्ञानज्योत फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा कविता काळे, कार्याध्यक्षा कांचन मून आणि मार्गदर्शक रघुनाथ कांबळे यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ठाण्याचे साहित्यिक संजय गवांदे यांनी केले.

# पक्षाचे मिळालेले पद लोकांच्या उपयोगी आणावे

### पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांचे प्रतिपादन; शहरात पदाधिकारी मेळाव्यातून एकवटले शिवसैनिक; सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेवर भगवा फडकविण्याचा संकल्प; निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पदाधिकाऱ्यांना सक्रीय होण्याचे आवाहन




आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्यावतीने पदाधिकारी मेळाव्यात मार्गदर्शन करताना पर्यटन मंत्री शंभूराज देसाई व इतर.

नगर – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलतात कमी, पण परफ ेक्ट काम करून दाखवतात. कार्यकर्त्यांवर बारीक लक्ष देणारा व सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविणारा नेता पक्षाला लाभला आहे. पक्षासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी योगदान द्यावे, पक्षाचे मिळालेले पद लोकांच्या उपयोगी आले पाहिजे, आठवड्यातून दोन दिवस पक्षासाठी देण्याचे आवाहन पर्यटन मंत्री तथा संपर्क नेते शंभूराज देसाई यांनी केले.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने पदाधिकारी मेळाव्यात मार्गदर्शन करताना पर्यटन मंत्री देसाई बोलत होते. सावेडी येथील माऊली सभागृहात झालेल्या मेळाव्यासाठी जिल्ह्यातून पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, बाबू टायरवाले, शहर प्रमुख सचिन जाधव, संभाजी कदम, दिलीप सातपुते, कमलाकर कोते, नितीन औताडे, नगर तालुका प्रमुख अजित दळवी, रामदास भोर, मनोहर पोटे, नंदकुमार ताडे, सागर बेग, माजी महापौर शिलाताई शिंदे, सुरेखा कदम, रोहिणीताई शेंडगे, माजी नगरसेविका अश्विनी जाधव, संपर्क प्रमुख उज्वलाताई भोपळे, शोभाताई अकोलकर, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, गणेश कवडे, संजय शेंडगे, सचिन शिंदे, आप्पा नळकांडे, संतोष ग्यानप्पा, परेश लोखंडे, दत्ता कावरे, युवा सेनेचे राज्य संघटक बाजीराव चव्हाण, प्रशांत गायकवाड, दिपक खैरे, संग्राम कोतकर, बबलू शिंदे, दशरथ शिंदे, आशुतोष डहाळे, बापूसाहेब नेटके, कैलास माने, संदेश कार्ले, शरद झोडगे, दिलीप पवार, युवा सेनेचे जिल्हा प्रमुख योगेश गलांडे, आकाश कातोरे, सुभाष आल्हाट, साईनाथ आधाट, महेश लोंढे, ओंकार शिंदे, अमोल होंबे, सुरेखा गव्हाणे आदी उपस्थित होते.

पुढे देसाई म्हणाले की, शिवसेनेत शिस्तबद्ध काम सुरु आहे. सक्रीय सदस्यांना संधी दिली जाणार आहे. निवडणुकांपूर्वी सर्व रिक्तपदे भरली जाणार आहे. कोट्याप्रमाणे सर्व पदाधिकाऱ्यांना सदस्य नोंदणी करावयाची असून, याचा तालुका निहाय आढावा घेतला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

निवडणुकांना सामोरे जाताना महायुती रहावी व महायुतीच्या माध्यमातून निवडणुका लढवल्या जाव्या ही शिवसेनेची अपेक्षा आहे. तरी समन्वय समितीच्या अहवालानुसार निवडणुका कशाप्रकारे लढवायचे? हे तिन्ही पक्षाचे प्रमुख निर्णय घेणार असल्याचे सुतोवाच त्यांनी केला. तर जिल्हा नियोजन मधून पालकमंत्री यांनी शिवसेनेच्या लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांना विकास कामांसाठी उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी सांगितले. अडीच वर्षाच्या मुख्यमंत्री असताना केलेल्या कामाला प्रतिसाद देत जनतेने एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व मान्य केले व मोठ्या मताधिक्यांनी विधानसभेच्या जागा निवडून दिल्या. घराघरात शिवसैनिक निर्माण करून, मनामनात शिवसेनेचे विचार रुजविण्याचे त्यांनी आवाहन केले.

आमदार अमोल खताळ यांनी सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम एकनाथ शिंदे यांनी केले. ते मुख्यमंत्री असताना मोठ्या प्रमाणात विकास कामे करण्यात आल्याने, मतदार देखील शिवसेने मागे उभा राहण्यास तयार असल्याचे सांगितले.

आमदार विठ्ठलराव लंघे म्हणाले की, एकनाथ शिंदे लोकाभिमुख कार्य करत आहे. त्यांनी केलेला कामाला प्रतिसाद देत रेकॉर्ड ब्रेक सत्ता जनतेने महायुतीला दिली. ते कष्टाने शिवसेना पुढे घेऊन जात असून, आगामी निवडणुकांमध्ये ग्रामपंचायत ते जिल्हा परिषदेत भगवा फडकणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन व दीपप्रज्वलनाने मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. मंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते विविध पदाची नियुक्तीपत्रे देण्यात आली. पंचायत समिती सदस्य राहुल गवळी, अतुल लोखंडे, वसंतराव खतारे, विनोद गायकवाड, माजी नगरसेवक दशरथ शिंदे आदींनी कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला. स्वागत अनिल शिंदे व सचिन जाधव यांनी केले. प्रास्ताविक संभाजी कदम यांनी केले. सूत्रसंचालन राजेंद्र टाक यांनी केले. दिलीप सातपुते यांनी आभार मानले.

# जनतेपर्यंत पोहोचा, मागील वेळेपेक्षा मनपात २ जागा निश्चित जास्त मिळतील

### विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा विश्वास; शहर प्रमुख किरण काळेंच्या निवासस्थानी दिली सदिच्छा भेट



विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते ना. अंबादास दानवे नगर शहर दौऱ्यावर आले असता त्यांनी शहरप्रमुख किरण काळे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी शिवसैनिकांशी त्यांनी संवाद साधला. पंडित नेहरू यांनी नगरमध्ये लिहिलेले डिस्कवरी ऑफ इंडिया पुस्तक काळे यांनी भेट देत दानवे यांचा सत्कार केला.

नगर – संघटना आईसारखे असते, आईवर कुणी नाराज होत नाही, नव्या जुन्यांनी एकत्र आले पाहिजे. जो चालेल, धावेल त्याची संघटना हे लक्षात ठेवले पाहिजे. आगामी महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये प्रत्येक प्रभागापर्यंत, जनतेपर्यंत आपण पोहोचलो पाहिजे. मागील वेळेपेक्षा दोन जागा आपल्याला निश्चित जास्त मिळतील, असा विश्वास राज्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी व्यक्त करून प्रशासक काळात सत्ताधारी विरोधकांनी कशा पद्धतीने महापालिका लुटली हे जनतेपर्यंत पोहोचवा, असे आवाहन केले.

खाजगी दौऱ्यावर आले असता दानवे यांनी अहिल्यानगर शहर प्रमुख किरण काळे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी शहर प्रमुख किरण काळे, जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख पप्पू भाले, दीपक भोसले, विलास उबाळे, सुनील त्रिपाठी, रावजी नांगरे, विकेश गुंदेचा, संजय वल्लाकट्टी, राजू औटी, सुनील भोसले, आनंद राठोड, गौरव ढोणे, महावीर मुथा, किशोर वाघ, सचिन शेंडगे, सुजय लांडे, ऋतुराज आमले, मिलन सिंग, शंकर आव्हाड, किशोर कोतकर, गणेश आपरे, विकास भिंगारदिवे, मयूर भिंगारदिवे, जयराम आखाडे, भगवान शेंडे, दत्ता गायकवाड, दीपक काकडे, सिद्धांत भिंगारदिवे, पोपट लोंढे, भगवान शेंडे, रोहिदास भालेराव, विनोद शिरसाट, सचिन भालेराव, सचिन कापुरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

**मविआ पदाधिकाऱ्यांची उपस्थिती :** यावेळी शहर महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी अंबादास दानवे यांची भेट घेतली. ब्लॉक काँग्रेसचे शहर अध्यक्ष मनोज गुंदेचा, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अनिस चूडीवाला, महिला जिल्हाध्यक्ष उषा भगत, महिला उपाध्यक्ष शैलाताई लांडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर कार्यकारी अध्यक्ष अनिकेत कराळे, रिपब्लिकन एसआरपी टायगर संघटनेचे जिल्हाध्यक्ष नाथाभाऊ आल्हाट आदी उपस्थित होते.

अंबादास दानवे म्हणाले की, आपल्यातून अनेक जण दुसऱ्या पक्षात गेले. पण संघटना ही काही थांबत नाही. रेल्वे ज्या पद्धतीने असते तिच्या डब्यातून अनेक जण उतरतात, तर अनेक जण चढतही असतात. काहीजण गेले म्हणजे नव्याने कोणी तरी येत असतं हे लक्षात ठेवावं. त्याच पद्धतीने आपल्याला सुद्धा आता नव्या जुन्याची सांगड घालून पक्ष संघटना अधिक बळकट करायची आहे. दानवे म्हणाले, आजच्या काळामध्ये जो चालेल, धावेल, त्याची ही संघटना असेल.

**स्व. अनिल भैय्यांची आजही आठवण :** दिवंगत उपनेते अनिल राठोड यांनी या नगर शहरामध्ये नेतृत्व केलं. ज्या वेळेला मराठवाड्यात नामांतराच्या आंदोलना नंतर अटक झालेल्या शिवसैनिकांना विसापूरला आणले होते. त्यांना राठोड मदत केली होती. नगरमध्ये पंचवीस वर्ष त्यांनी जनतेची सेवा केली. आजही त्यांची आठवण आल्याशिवाय राहत नाही.

**प्रत्येक प्रभागात जा :** आम्ही सुद्धा संघर्षातून संभाजीनगरमध्ये लढलो. प्रत्येकापर्यंत पोहोचलो. त्याच पद्धतीने तुम्ही पण प्रत्येक भागात, गल्लीत जा. सगळ्या ठिकाणी तुम्ही पोहोचा. जनतेमध्ये जा. जनता ही नेहमीच आपल्याबरोबर असते. यंत्रणा उभी करा. सामान्य माणसापर्यंत पोहोचा. प्रत्येक बूथ बांधा. पदाधिकारी नियुक्त करा. निश्चितपणे संघटना उभी राहिल्याशिवाय राहणार नाही.

**आम्ही नाही शिवसैनिक मालक :** संघटनेमध्ये काम करताना सर्वांनी एकत्रितपणे काम केले पाहिजे. ज्यांना जायचं ते गेले. पण संघटना काही थांबली नाही. आपण मालक नाही, शिवसैनिक हा मालक आहे, ही भावना सातत्याने लक्षात ठेवा, असे दानवे यांनी यावेळी सांगितले.

**ते ही शिवसेनेच्या संपर्कात :** नगर जिल्ह्यातून अनेक जण इतर पक्षांमध्ये गेले. नगरसेवक असो पदाधिकारी असो. ते आजही शिवसेनेच्या संपर्कामध्ये आहेत. वारं केव्हाही, कसंही फिरतं हे लक्षात असू द्या, असा टोला यावेळी त्यांनी लगावला. त्यामुळे भविष्यात गळालेले काही चेहरे परत शिवसेनेच्या गळाला लागणार काय आशा चर्चेला तोंड फुटले आहे.

**त्यांच्या कारभाराची पोलखोल करा :** महापालिकेमध्ये विरोधकांची पण सत्ता होती. प्रशासकाच्या माध्यमातून सत्ताधारी महायुतीच्या हातातच मनपाचा रिमोट कंट्रोल आहे. यांचा हरामाचा पैसा होता. त्यांनी त्या सत्तेचा वापर कशा पद्धतीने केला हे जनतेला सांगा. त्यांनी कशी महानगरपालिका लुटली हे सांगा. आपण काय करणार हे नंतर सांगू. पण या ठिकाणी रस्ते, वीज, पाणी, ड्रेनेज यासाठी कशा पद्धतीने सत्ताधाऱ्यांनी जनतेला वेठीस धरलं हे सर्व जनतेपर्यंत पोहोचवा. प्रत्येकाने मी जिंकणारच हा निर्धार करून जोरदार कामाला लागा, असे आवाहन यावेळी दानवे यांनी केले.

**मनपावर भगवा फडकवू :** यावेळी किरण काळे म्हणाले, आजही नगर शहरामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये शिवसेनेची संघटना उभी आहे. संघटनेला अधिक बळकट करण्याचं काम करायचं आहे. शिवसेना हा नगरकरांचा श्वास असून ती कधीच संपू शकत नाही. सगळ्यांना सोबत घेत आगामी काळामध्ये महानगरपालिकेमध्ये सत्ता आणण्यासाठी कशा पद्धतीने नियोजन करू शकतो याची आत्तापासूनच शिवसेनेने तयारी सुरू केली आहे. मनपावर शिवसेना नक्की भगवा फडकवेल, असे काळे यावेळी म्हणाले.

